**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/ 347 दिनांक : ०३.०२.२०२०

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची तात्काळ पडताळणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९-२०/डीबीटी/१३४० दि. ०१.०२.२०२०.

उपरोक्त विषयाबाबतकळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून प्राप्त ऑनलाईन अर्ज पडताळणी करणेसाठी शैक्षणिक संस्थांना दि. २०.०२.२०२० पर्यंत शेवटची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, अशा प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी संबंधित शैक्षणिक संस्थांना त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

दि. ०१.०२.२०२० रोजीच्या डीबीटी डॅशबोर्डनुसार, खालील प्रमाणे पुणे विभागांतर्गत पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे.

| SR. NO. | APPLICATION RECEIVED | APPROVED BY INSTITUTE | PENDING AT INSTITUTE | APPROVED BY DEPT. | PENDING AT DEPT. | SENT BACK TO APPLCANT | PENDING AT INSTITUTE (2nd Installment) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 52,631 | 40,420 | 2,393 | 40,397 | 23 | 2,370 | 4,211 |

Scanned by CamScanner

प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. त्यामुळे प्रलंबित राहिलेल्या अर्जाबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित विद्यापीठाबाबत संबंधित कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थितीबाबतची माहिती नमूद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर इन्स्टिट्यूट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहिती नमूद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होणार नाही. कोणत्याही महाविद्यालय/संस्था/विद्यापीठ यांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांचे स्तरावर शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु केलेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांचे स्थिती तपासावी. डीडीओद्वारे लाभ वितरीत केल्यास रिडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रीडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे. सदरची बाब सर्व महाविद्यालय/संस्था/विद्यापीठ यांनी विद्यार्थ्यांना गांभीर्याने निदर्शनास आणून द्यावी.

तसेच संस्था/महाविद्यालय/विद्यापीठांच्या लॉगीनमध्ये लिपीक व प्राचार्य स्तरावरुन अर्जांची मुदतपूर्व पडताळणी न केल्यामुळे असे प्रलंबित राहीलेले अर्ज सिस्टीमद्वारे आपोआप नामंजूर होतात. त्यामुळे संस्था / महाविद्यालय/विद्यापीठांच्या लॉगीनमध्ये पडताळणीसाठी उपलब्ध असलेल्या अर्जांची मुदतपूर्व दि. १९.०२.२०२० पर्यंत पडताळणी करणे अत्यावश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत संस्था /महाविद्यालय /विद्यापीठांच्या लॉगीनवर दि. १९.०२.२०२० नंतर एकही शिष्यवृत्ती अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. तसेच महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित राहिल्यामुळे एकही शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठांचे कुलसचिव यांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner